# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा. झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाज कल्याण समिती
## कार्यपत्रिका क्रमांक : ६
## सभावृत्तांत

दिनांक : २/१२/२००९ वेळ : दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाज कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक २/१२/२००९ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.आदियाल (शीख) शोभा गुरुमितसिंग - सभापती
२. मा.काळुराम मारुती पवार
३. मा.तानाजी विठ्ठल खाडे
४. मा.रामआधार धारिया
५. मा.साबळे जगन्नाथ दगडु
६. मा.उत्तम मुक्ताजी हिरवे
७. मा.तापकीर मच्छिंद्र भाउसाहेब
८. मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर

याशिवाय मा.चाकणकर- उप नगरसचिव,मा.लडकत - प्र.कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले-

विषय क्रमांक :- २) झोपडपट्टीतील ठिकठिकाणी शौचालयामध्ये दरवाजे बसविणेबाबत .. मा.उत्तम हिरवे,मा.बाळासाहेब भुंबे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- ३) गांधी नगर,वैशालीनगर,भारत नगर येथे मोठया व्यासाच्या जलनि:सारण नलिका टाकणेबाबत..मा.उत्तम हिरवे,मा.मच्छिंद्र तापकिर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- ४) से.क्र.२२ निगडी येथे १०० बेडचे अद्यावत हॉस्पिटल मनपा फंडातुन करणेबाबत.. मा.तानाजी खाडे,मा.काळुराम पवार,मा.उत्तम हिरवे,मा.मच्छिंद्र तापकीर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक : ५) समितीस र.रु.५ लाख ते र.रु.५० लाख पर्यंत प्रशासकीय मान्यता देणेच्या अधिकाराबाबत..मा.तानाजी खाडे,मा.उत्तम हिरवे,मा.मच्छिंद्र तापकिर,मा.काळुराम पवार यांचा प्रस्ताव..

दिनांक २/०९/०९,१६/०९/०९,७/१०/०९,२१/१०/०९ ,४/११/०९ व १८/११/२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ५ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

ठराव क्रमांक - २० विषय क्रमांक - १
दिनांक- २.१२.२००९ विभाग - झोनिपु स्थापत्य
सुचक- मा.बाळासाहेब भुंबे अनुमोदक - मा. उत्तम हिरवे
संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/७६९/०९ दि.२३/११/२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

वॉर्ड क्र.३६ मधील आनंदनगर झोपडपट्टीमध्ये समाजमंदिरामागे जुने शौचालय पाडुन त्याठिकाणी पैसे द्या व वापरा या तत्वावर २६ सिट्सचे शौचालय बांधणेकामी र.रु.२९,९२,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले-</u>

ठराव क्रमांक - २१ विषय क्रमांक - २
दिनांक- २.१२.२००९
सुचक- मा.उत्तम हिरवे अनुमोदक - मा. बाळासाहेब भुंबे
संदर्भ - मा.उत्तम हिरवे,मा.बाळासाहेब भुंबे यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील झोपडपट्टी मध्ये ठिकठिकाणी अंदाजे २००० सिट्स शौचालय आहेत. सदर शौचालयांचे देखभाल व दुरुस्ती विविध संस्थेमार्फत केली जाते. परंतु सदर संस्थेमार्फत ज्या ठिकाणी दरवाजाचे शटर नाही त्या ठिकाणी नविन शटर बसविले जात नाही. झोपडपट्टीतील ब-याच शौचालयामध्ये दरवाजे नाहीत.तरी सदर ठिकाणी वजनास हलके असलेले ABS पध्दतीचे दरवाजे बसविणेकामी र.रु.२५,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक - २२ विषय क्रमांक - ३
दिनांक- २.१२.२००९
सुचक- मा.उत्तम हिरवे अनुमोदक - मा.मच्छिंद्र तापकिर
संदर्भ - मा.उत्तम हिरवे,मा.मच्छिंद्र तापकिर यांचा प्रस्ताव..

गांधीनगर,वैशालीनगर,भारतनगर येथील ड्रेनेज लाईन चोकअपच्या तक्रारी येत आहेत. पुर्वीच्या कमी व्यासाच्या जलनि:सारण लाईन अपु-या पडत आहेत. तरी सुधारणायोजने अंतर्गत मोठया व्यासाच्या नविन लाईन टाकणेकामी र.रु. ५०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक - २३ विषय क्रमांक - ४
दिनांक- २.१२.२००९
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.उत्तम हिरवे
संदर्भ - मा.तानाजी खाडे,मा.काळुराम पवार,मा.उत्तम हिरवे,मा.मच्छिंद्र तापकीर यांचा प्रस्ताव..

से.क्र.२२ निगडी येथे JNNURM अंतर्गत मोठया प्रमाणावर निवासी गाळे बांधणेत येत आहेत. सदर गाळेधारकांसाठी सदर ठिकाणी १०० बेडचे अद्यावत हॉस्पिटल बांधणे आवश्यक आहे. सदर काम JNNURM अंतर्गत करणेस मान्यता मिळाली आहे तथापि त्यास शासनाने मान्यता दिली नाही. त्यामुळे सदरचे काम मनपा फंडातुन करुन घेणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक - २४ विषय क्रमांक - ५
दिनांक- २.१२.२००९
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.उत्तम हिरवे
संदर्भ - मा.तानाजी खाडे,मा.उत्तम हिरवे,मा.मच्छिंद्र तापकीर, मा.काळुराम पवार यांचा प्रस्ताव..

यापुर्वी झोपडपट्टी सुधार,गृहनिर्माण व समाजकल्याण समितीमार्फत र.रु.५ लक्ष ते ५० लक्ष पर्यंतच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात येत होती. परंतु मा.महापालिका सभा ठराव क्र.३७१ दि.२०/५/२००८ नुसार मा.प्रभाग समितीस र.रु.१० लाखपर्यंत अधिकार प्रदान केले आहेत. त्यामुळे र.रु. १० लाखपर्यंतच्या कामाचे विषय झोपडपट्टी समितीपुढे येत नाहीत. तरी सदर ठरावात दुरुस्त करुन झोपडपट्टीमध्ये जी कामे केली जातात त्यासाठी स्वतंत्र तरतुद असल्यामुळे सदर कामाच्या अंदाजपत्रकीय

र.रु.५ लक्ष ते र.रु.५० लक्ष पर्यंत प्रशासकीय मान्यता देणेचे अधिकार व र.रु. ५० लक्ष पेक्षा जास्त रक्कमेच्या कामांना झोपडपट्टी सुधार समितीने शिफारस करुन मनपा सभेकडे पाठविणेचे अधिकार झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण व समाजकल्याण समितीकडे देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(आदियाल (शीख)शोभा गुरुमितसिंग)
सभापती
झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि
समाज कल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/०९/कावि/१३७७/२००९
दिनांक :- ३/१२/२००९

सही/-
उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.